## जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
## दरपत्रके मागविण्याबाबत सुचना

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे आदेशान्वये सुचित करण्यात येते की जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील अभिलेखागारातील कालबाहय झालेल्या अभिलेख नष्ट करण्यात आलेली रद्दी विकण्यासाठी स्थानिक रद्दी खरेदीदारांकडुन अटी व शर्तीच्या अधीन राहून खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहे.

१. रद्दी पेपर (प्रति किलो)
२. न्युज पेपर (प्रति किलो)
३. जुनी फाटलेली व निरूपयोगी पुस्तके (प्रति किलो)

**अटी व शर्ती :**

१) खरेदीदारांनी आपले नांव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकीटावर ठळक अक्षरात नमुद करणे आवश्यक आहे, तसे नसल्यास आपले पाकीट विचारात घेतले जाणार नाही.

२) रद्दी खरेदीदाराने स्वत:चा इलेक्ट्रॉनिक वजन काटा सोबत आणावे.

३) वजन काटा व्यवस्थित असावे त्यात काही फेरफार नसावे. असे काही आढळ्यास आपणांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) दरपत्रक कार्यालयात जमा केल्यावर आपणांस दरपत्रक उघडण्याची वेळ सुचित केली जाईल व त्याप्रमाणे आपणांस कार्यालयात उपस्थित राहावे लागेल व आपल्या उपस्थितीत सर्व दरपत्रक उघडण्यात येईल.

५) सुचित केल्यावर आपण उपस्थित झाले नाही तर आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल व ते विचारात घेतले जाणार नाही.

६) आपल्या समोर दरपत्रक उघडल्यावर ज्याचे दर जास्त असेल त्याला रद्दी उचलण्याचे आदेश निर्गमित करण्यात येईल.

७) आदेश प्राप्त झाल्यावर आपल्याला सुचित केल्यावर आपण १-२ दिवसात रद्दी उचलण्याची व्यवस्था करावी.

८) रद्दी उचलण्याच्या पूर्वी कार्यालयातील नियुक्त केलेल्या अधिकारीशी भेटावे व त्यांचाच समोर रद्दी मोजणी करावे.

९) संपूर्ण रद्दी मोजणी झाल्यावर त्याच दिवशी नाझर, रोख व वित्त विभाग, ७ वा माळा, जिल्हा न्यायालय, नागपूर यांच्याकडे रोकडमध्ये रक्कम जमा करावे.

१०) आदेश निर्गमित झाल्यावर ७ दिवसांच्या आत आपणांस सुरक्षा ठेव म्हणुन रू. ५,०००/- विना व्याजी उपरोक्त कार्यालयात जमा करावे लागेल.

११) आपला करार ६ महिन्याचे असेल व करार संपल्यावर आपणांस जमा केलेली रक्कम आपल्या अर्जाच्या अनुषंगाने परत करण्यात येईल.

१२) जर आपण रद्दी उचलण्यास टाळाटाळ केल्यास किंवा अन्य काही कारणास्तव रद्दी उचलण्यास वेळ वाया घातल्यास तर आपल्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व आपली सुरक्षित ठेव रू. ५०००/- सरकार जमा करण्यात

येईल.

१३) उपरोक्त अटी व शर्ती भंग केल्यास जमा केलेली रक्कम परत मिळणार नाही.

इच्छुक खरेदीधारकांना यास्तव सुचित करण्यात येते की, त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांचे कार्यालयात सातवा माळा, आस्थापना विभाग येथे दि. १०/०२/२०२१ चे दुपारी ३.०० वाजेपावेतो बंद लिफाफ्यात दरपत्रके सादर करावयात.

लिफाफ्यावर ''रद्दी खरेदीचे दरपत्रक'' असे नमुद असावे व मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावांने लिफाफा पाठवावा.

Court of the District and Sessions Judge NAGPUR

आदेशान्वये,
दिनांक: ०४/०२/२०२१

04/2/21
प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नागपूर.

C:\Users\District court\Desktop\Cash and Finance\KHUSHAL\Notesheet.odt